REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख २१ एप्रिल १९४८ अंक १५

## दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)

पुणें शाखाः—९७५ सदाशिव, लक्ष्मी रोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारीचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. —एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.— ब्रँच सेक्रेटरी

## दि रत्नाकर बँक, लि.

स्थापना : १९४३

—: शाखा :—

( १ ) कोल्हापूर, ( २ ) शाहुपुरी, ( ३ ) सांगली, ( ४ ) मिरज, ( ५ ) जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,१७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | १०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | १८,००,००० |

—अद्यावत बँकिंग व्यवहार केले जातात—

नामदार बी. बी. पाटील
B. A., LL. B., डेव्हलपमेंट मिनिस्टर, सांगली स्टेट.
चेअरमन

श्री. गं. सि. चौगुले.
M. L. A.
कोल्हापूर
व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा.
B. COM. C. A. I. I. B.
मॅनेजर

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स काँपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी

★ दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी ★

९६ नारायण पेठ, पुणें २.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें









## विविध माहिती

**इंग्लंडमध्यें बनविलेल्या फोर्ड मोटारी**—फोर्ड बनावटीच्या मोटारी इंग्लंडमध्यें बनविण्यास आरंभ झाला असून अशा मोटारींचा पहिला ताफा अमेरिकेंत लवकरच पाठविला जाईल. ह्या ताफ्यांत निरनिराळ्या प्रकारच्या मिळून ४५० फोर्ड मोटारी आहेत. चालू महिन्याच्या अखेर आणखी १,००० मोटारी धाडण्यांत येतील, असें समजतें.

**इंग्लंडकडे गव्हाची याचना**—फ्रान्समधील गव्हाचा सांठा संपत आल्यामुळें फ्रेंच सरकारनें इंग्लंडकडे परत बोलीच्या अटीवर गहूं मागितला आहे. फ्रान्समध्यें नवें पीक हातीं येईपर्यंत गव्हाची टंचाई जाणवणार आहे.

**झेकोस्लोव्हाकिआ यंत्रसामुग्री देणार**—झेक सरकारच्या लंडनमधील परराष्ट्रीय व्यापारखात्याच्या एका अधिकाऱ्यानें झेकोस्लोव्हाकिआ पाकिस्तानशीं व हिंदुस्थानशीं व्यापार करण्यास उत्सुक असल्याचे उद्गार काढले. हिंदुस्थानकडून कापूस, ताग व तांदूळ घेऊन त्याबद्दल यंत्रें व ग्राहकांना लागणाऱ्या वस्तू देण्यास झेक सरकार तयार आहे, असेंही त्या अधिकाऱ्यानें जाहीर केलें.

**बडोद्यांत कृत्रिम रेशमाची गिरणी**—बडोदा येथें कृत्रिम रेशमाची गिरणी काढण्याच्या सर होमी मेहता ह्यांच्या योजनेला हिंदी सरकारनें मान्यता दिली आहे. कारखान्याच्या पहिल्या पांच वर्षांत प्राप्तीवरील कर आणि म्युनिसिपल कर ह्यांची माफी देण्यांत आली आहे. कारखान्याच्या भांडवलांत जास्तींत जास्त २० लाख रुपये भांडवल घालण्याची सवलत बडोदा सरकारला देण्यांत आली आहे. ह्या कारखान्यासाठी यंत्रसामुग्री आणण्यासाठी सर होमी मेथा विमानानें अमेरिकेस जात असतांना ता. १५ रोजीं वाटेंत विमान पेटून मरण पावले.

**इंग्रज तज्ज्ञांची आयात**—कलकत्ता, बंगलोरसारख्या शहरांतील कारखान्यांतून अलीकडे ब्रिटिश तज्ज्ञांची आयात अधिक होऊं लागली आहे. ऑगस्ट १५ पासून सुमारें ४,५०० ब्रिटिश यंत्रज्ञ, तंत्रज्ञ व व्यापारी कलावंत १ ते ५ वर्षांच्या करारानें हिंदुस्थानांत आले. स्वातंत्र्यदिनापूर्वी ब्रिटिश तंत्रज्ञ आणण्यास हिंदी कंपन्यांचा विरोध होता; पण आतां तो कमी झाला आहे.

**रिझर्व्ह बँकेच्या तक्त्यांत पाकिस्तानी नोटा**—रिझर्व्ह बँकेच्या साप्ताहिक तक्त्यांत हिंद व पाकिस्तान सरकारच्या चलनी नोटांचे आकडे स्वतंत्र देण्यांत येऊं लागले आहेत. कारण, १ एप्रिल, १९४८ पासून पाकिस्तान सरकारनें स्वतःचें स्वतंत्र चलन सुरू केलें आहे.

**कापसाच्या लागवडीचें क्षेत्रफळ**—१९४६-४७ सालीं हिंदी संघराज्याच्या प्रदेशांत ३१,५०,००० एकर जमिनींत कापूस पिकविण्यांत आला होता. १९४७-४८ सालीं ह्या क्षेत्रफळांत ९ टक्क्यांनीं वाढ झाली असून तें क्षेत्रफळ ३४,४२,००० एकर झालें असावें असा अंदाज आहे. चालू वर्षी कापसाच्या पिकाची परिस्थिति चांगली आहे.

**हिंदी भातशेतीच्या क्षेत्रफळाचा अंदाज**—१९४७-४८ सालांतील भातशेतीच्या क्षेत्रफळाचा अंदाज ५,३१,२६,००० एकर इतका करण्यांत आला आहे. १९४६-४७ सालीं हें क्षेत्रफळ ५,३४,९५,००० एकर होतें. ह्या दोन्ही अंदाजांत पश्चिम हिंदुस्थानांतील संस्थानांच्या तांदुळाच्या उत्पादनाचा विचार करण्यांत आलेला नाहीं.

**हिंदुस्थानसाठी कापडाचे जपानी माग**—जपानमधील ६० लाख डॉलर्स किंमतीची कापडाच्या गिरण्यांची यंत्रसामुग्री हिंदुस्थानला विकण्याचा सौदा झाला आहे. ह्या कराराप्रमाणें हिंदुस्थानला ६,००० यांत्रिक माग, १ लाख चात्या, विणण्याचीं यंत्रें व इतर सामग्री मिळणार आहे. जपानकडून इंग्लंडही ७०० माग व ३५,००० चात्या घेणार आहे, असें समजतें.


वर्कशॉप मशीनरी (२)
हेवी ड्यूटी
शिमोगा लेथ
(८′—१०″)
संपूर्ण देशी, पहिल्या प्रतीचा, तज्ञांचे देखरेखीखालीं कुशल कारागिरांनीं अद्यावत् साधनांनीं बनविलेला
— चौकशी स्थान —
केळकर बंधु, बुधवार चौक, पुणें २.

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

एजन्सी घ्या
संस्थेची प्रगति व एजन्सीच्या उदार शर्ती ह्यामुळें लाभदायक ठरलेली "सह्याद्रि"ची एजन्सी घेऊन आपला आर्थिक प्रश्न सोडवा.

प्रगतीचा आढावा
आलेलें काम २ कोटी ९५ लक्ष
मंजूर काम २ कोटी ५३ लक्ष
पूर्ण काम १ कोटी ३० लक्ष
सन १९४७ मधील पूर्ण काम ६० लाखांवर

यशस्वी मूल्यमापन
इ. बोनस } हयातीचे विमे रु. ६ / मुदतीचे विमे रु. ५
याशिवाय सर्व प्रकारचे रिझर्व्हज् राखूनही झालेला निव्वळ फायदा रु. ५०,०००/-

ह्या संस्थेंतच आपला आयुर्विमा उतरा. सविस्तर माहितीसाठी लिहा.
कचेऱ्या:—दिल्ली, मुंबई, पुणें, बेळगांव, कोल्हापूर, म्हापसें, गोवा, रत्नागिरी, सावंतवाडी, हुबळी, अहमदाबाद, नागपूर, धुळें, इंदूर, हारदा, रायपूर, जबलपूर, अमरावती, कारवार, वगैरे.
गो. ग. सादणकर, मॅ. डायरेक्टर, सह्याद्रि विमा कं. लि., नासिक.

# अर्थ

बुधवार, ता. ११ एप्रिल १९४८

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.





प्रो. वा. गो. काळे

## युद्धोत्तर जागतिक आर्थिक परिस्थिति

यूनोच्या आर्थिक गोष्टींच्या समितीनें १९४५ ते ४७ ह्या दोन वर्षांतील जागतिक आर्थिक परिस्थितीचा आढावा नुकताच प्रसिद्ध केला आहे. त्यावरून आर्थिक परिस्थितीबद्दल पुढील गोष्टी प्रामुख्यानें दिसून येतात. महायुद्धकालांत उत्पादन, वहातूक व आर्थिक जीवनाचीं विविध अंगें या सर्व बाबतींत परिस्थिति मोडकळीस आली व युद्धांत भाग घेणाऱ्या व युद्ध-प्रयत्नांशीं कोणत्या ना कोणत्या कारणानें संबंध येणाऱ्या प्रत्येक देशाची अर्थव्यवस्थाहि बरीच मोडकळीस आली. पहिल्या प्रकारचे देश म्हणजे युरोपिअन राष्ट्रें, बर्मा, इंडोचायना, उत्तर आफ्रिका इ. प्रमुख होत; तर दुसऱ्या प्रकारचे देश म्हणजे हिंदुस्थान, चीन, इतर एशियाटिक राष्ट्रें इ. होत. महायुद्धामुळें प्रत्यक्ष अर्थ-व्यवस्थेवर परिणाम झाला तरी युद्ध व युद्धोत्तर परिस्थितीमुळें आर्थिक व्यवहारांवर पोषक परिणाम झाला असे तिसऱ्या गटांतील देश म्हणजे विशेषतः यु. एस्. ए. ( अमेरिका ), कॅनडा, ऑस्ट्रेलिया, अर्जेंटिना इ. होत. वरील पैकीं पहिल्या गटांतील देशांची परिस्थिति हळू हळू महायुद्धानंतर सुधारूं लागली आहे व ह्या गटांतील बहुतेक प्रत्येक देशाजवळ यांत्रिक शक्ति व उत्पादनाच्या साधनांवर प्रभुत्व असल्यामुळें, विशेष प्रयत्नांनीं किंवा अमेरिकेसारख्या देशाकडून कर्जें घेऊन ह्या राष्ट्रांना आपली परिस्थिति निश्चितपणें सुधारतां येणार आहे. दुसऱ्या गटांतील देश म्हणजे चीन, हिंदुस्थानसारखे. यांच्या बाबतींत आर्थिक जीवनाला आवश्यक अशी भौगोलिक पार्श्वभूमि अस्तित्वांत असली तरी आधुनिक औद्योगिक जीवनाला पोषक अशी यंत्रसामुग्री निर्माण करण्याचें ज्ञान नसल्यामुळें त्यांच्या आर्थिक परिस्थितीला बरेचसें परावलंबी स्वरूप प्राप्त झालें आहे. यांतच ऐतिहासिक कारणांची भर पडली आहे व आज जरी हे देश राजकीय दृष्ट्याहि स्वतंत्र झाले असले तरी दीर्घ कालाच्या ऐतिहासिक परिणामानें निर्माण झालेले औद्योगिक जीवनांतील दोष ह्या प्रकारच्या राष्ट्रांना अल्प काळांत सुधारतां येण्यासारखे नाहींत. कारण त्यांच्या अर्थ-व्यवस्थेची सर्व मदार इंग्लंड, अमेरिका, कॅनडा इ. देशांकडून होणाऱ्या यंत्रसामुग्रीच्या व औद्योगिक आणि तांत्रिक तज्ज्ञांच्या मदतीवर अवलंबून आहे. तिसऱ्या गटांतील राष्ट्रांची स्थिति मात्र विलोभनीय आहे. कारण, युद्धप्रयत्नांना मदत करतांना ह्या राष्ट्रांची उत्पादन–शक्ति वाढून हीं राष्ट्रें आज प्रत्येक बाबतींत वैभवाच्या शिखरावर चमकत आहेत. जागतिक आर्थिक जीवनाच्या नाड्या थोड्याशा प्रमाणांत ह्या राष्ट्रांनीं आपल्या हातांत ठेवल्या आहेत. यंत्रसामुग्री, औद्योगिक तज्ज्ञ, अन्नधान्य, इ. चा पुरवठा ह्या राष्ट्रांकडून इतर गरजू देशांना होऊं शकतो. ह्याच्याच जोडीला हीं राष्ट्रें जगाच्या नवीन भागांतील असल्यामुळें त्यांच्या लोकसंख्येचें प्रमाण तुलनात्मक दृष्ट्या फारच बेताचें आहे. हीं राष्ट्रें वर्धिष्णू अर्थव्यवस्थेचीं निदर्शक आहेत.

अशा तऱ्हेच्या त्रिविध स्वरूपाच्या निरनिराळ्या राष्ट्रांत पुढील चित्र साधारणपणें दिसून येतें. युद्ध–पूर्व काळाशीं तुलना करतांना, युद्धकाळांतील मनुष्यहानि लक्षांत घेऊनहि जगाची लोकसंख्या सुमारें १० टक्क्यांनीं वाढली आहे. लोकसंख्येच्या वाढीच्या मानानें उत्पादन शक्ति मुळींच वाढलेली नाहीं. याचा सरळ अर्थ असा कीं, जनतेचें राहाणीचें मान युद्धकाळानंतर सर्वसाधारण रीत्या निश्चित कमी झालें आहे. युद्ध संपल्यानंतर पहिल्या एक-दीड वर्षांत उत्पादन शक्तीला थोडीफार चालना मिळाली, चलनविस्तार कमी करून महागाई दूर करण्याचे प्रयत्न करण्याची भाषा बोलली जाऊं लागली, युद्धोत्तर पुनर्घटनेच्या योजना पुढें मांडल्या जाऊं लागल्या, कांहीं देशांना राजकीय स्वातंत्र्यहि प्राप्त झालें; परंतु युद्धानंतर सुरू झालेले उत्पादन–वाढीचे प्रयत्न पुढें न जातां, त्यांत प्रत्येक देशांतील विशिष्ट अंतस्थ कारणांमुळें ढिलाई होऊं लागली. संप, अशांतता, परस्परांविषयीं अविश्वास, दुसऱ्या देशांविषयीं अविश्वास, नवीन उदयास आलेल्या आंतरराष्ट्रीय संस्थांचा कमकुवतपणा, इ. गोष्टी निरनिराळ्या ठिकाणीं प्रत्ययास येऊन उत्पादन शक्तीला व युद्धोत्तर पुनर्घटनेच्या कार्याला व्यत्यय येऊं लागला. यांतच बहुतेक सर्व देशांत व त्यांतल्या त्यांत युरोपियन व एशियाटिक राष्ट्रांमध्यें अन्नटंचाईचा प्रश्न उग्र स्वरूप धारण करूं लागला. भूक भागविण्यासाठीं कित्येक राष्ट्रांचीं तोंडें उत्सुकतेनें वर उल्लेखिलेल्या तिसऱ्या गटांतील राष्ट्रांकडे म्हणजे अमेरिका, कॅनडा, अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया इ. देशांकडे पाहूं लागलीं. याप्रमाणें उत्पादनास आवश्यक अशी शांतता व समाधानकारक अन्नपरिस्थिति जगाच्या पुष्कळशा राष्ट्रांत अभावानें आढळूं लागली.

लोखंड, तांबें, जस्त, कथील, शिसें इ. च्या उत्पादनांत १ ते ४५ टक्क्यांपर्यंत घट झाली. गहूं व राय ह्यांचें उत्पादन युद्धापूर्वीच्या मानानें ४ टक्क्यांनीं घटलें व तांदळाचें उत्पादन ७ टक्क्यांनीं कमी झालें. जाड्याभरड्या हलक्या धान्याचें उत्पादन ३ टक्के कमी झालें. चरबी तेलें यांचें उत्पादन तर ६२ टक्के कमी झालें. साखरेच्या उत्पन्नांत ७ टक्के घट झाली दुधदुभत्याचे पदार्थ १३ टक्के कमी झाले. बटाट्यांचें उत्पन्नहि १७ टक्के कमी झालें. चालू सालीं वार्षिक दर माणशीं सरासरी अन्नाचा खप युद्धापूर्वीच्या मानानें १० टक्क्यांनीं कमी झाला आहे.

महायुद्धामुळें आशिया खंडाची परिस्थिति बाकीच्या जगाच्या मानानें फारच कमी दर्जाची व कमकुवत बनली व जपानचें औद्योगिक जीवन जवळ जवळ नष्ट झालेलें आहे. जपानच्या चढाईमुळें युद्धकाळांत ब्रह्मदेश, इंडोचायना इ. ठिकाणीं नाशहि पुष्कळ झाला. अतिपूर्वेकडील बहुतेक सर्व देशांत अन्नटंचाई तीव्रतेनें जाणवत आहे. हिंदुस्थान, चीन, मलाया येथें सरासरी अन्नाचा दर माणशीं वार्षिक खप युद्धापूर्वीच्या मानानें २० टक्के कमी झाला आहे. एशियाटिक राष्ट्रांतील बहुतेक लोकांना कमी प्रमाणांत व हलक्या प्रतीचें अन्न खावें लागत आहे. महायुद्ध संपून दोन वर्षें पुरीं झालीं तरी सर्व तऱ्हेच्या उत्पन्नाची टंचाई, तिसऱ्या गटांतील देश सोडून, सर्वत्र तीव्रतेनें जाणवत आहे, व एकंदर परिस्थिति आर्थिक स्थैर्याच्या दृष्टीनें चिंताजनक बनली आहे.

## बँकिंग कंपन्यांच्या कायद्यांत दुरुस्ती

हिंदी पार्लमेंटांत सरकारनें आणलेल्या बिलांतील कांहीं बाबी

( १ ) बँकिंग सेरीज इतर बाबतींत बँकिंग कंपन्यांना कंपनी कायदा लागू रहाणार आहेच. सहकारी बँका कायद्यांतून वगळलेल्या आहेत. सरकारला विशिष्ट परिस्थितींत कांहीं काळपर्यंत ह्या कायद्याची अंमलबजावणी तहकूब ठेवता येईल.

( २ ) कायदा अंमलांत आल्यापासून दोन वर्षांनंतर, कोणत्याहि कंपनीस तिच्या नांवांत 'बँक', 'बँकर' अथवा 'बँकिंग' हा शब्द असल्याविना बँकिंगचा धंदा करता येणार नाहीं. १-१-४८ रोजीं अस्तित्वांत असलेल्या बँकिंग कंपनीस हा नियम लागू नाहीं. एकाद्या कंपनीचे नांवांत वरील तीन पैकी एक शब्द असला परंतु ती संस्था कोणत्याहि कारणानें बँकिंग कंपनी होत नसली तरी तिला कायदा लागू होईल.

( ३ ) बिगर-बँकिंग कंपनीस, मागणी करतांच परत कराव्या लागणाऱ्या ठेवी स्वीकारण्याची बंदी आहे.

( ४ ) एजन्सीच्या धंद्याचे नांवाखाली कांहीं बँका व्यापारी बोजा पत्करतात; अशा व्यवहारांस बंदी आहे.

( ५ ) बँकेच्या जिंदगीच्या अप्रमाण असें वेतन तिच्या चालकास मिळणार नाहीं. चालकाचा बँकेशीं करार ५ वर्षांपेक्षा दीर्घ मुदतीचा असता कामा नये. १ जुलै, १९४४ रोजीं अंमलांत असलेले करार ३० जून, १९४९ नंतर चालू राहणार नाहींत.

( ६ ) कमी वसूल भांडवलाच्या बँका कायद्यानें अशक्य केल्या आहेत; किमान भांडवल-रिझर्व्हच्या मर्यादा घालून दिल्या आहेत.

( ७ ) एकूण मतांच्या १०% पेक्षा अधिक मतें एका भागीदाराचे अधिकारांत असतां कामा नयेत.

( ८ ) शेअर्सच्या वसूल भांडवलाच्या २½% पेक्षा जास्त कमिशन किंवा ब्रोकरेज देतां येणार नाहीं.

( ९ ) प्राथमिक खर्च, ऑर्गनायझेशन खर्च, शेअरविक्री कमिशन, ब्रोकरेज, तोटा, इत्यादि बाबी जिंदगीचे बाजूतून नाहींशा होईपर्यंत डिव्हिडंड देणें बेकायदा ठरेल. १ जानेवारी, १९४८ नंतर निघालेली बँक ९% पेक्षा जास्त डिव्हिडंड देऊं शकणार नाहीं.

( १० ) कोणासहि दोन बँकांचे डायरेक्टर रहाता येणार नाहीं.

( ११ ) डायरेक्टरांना, अथवा त्यांचा हितसंबंध असणाऱ्या पेढ्यांना किंवा खाजगी कंपन्यांना बँकेनें कर्ज देणें बेकायदा आहे.

( १२ ) प्रत्येक बँकेनें आपल्या देण्याच्या २०% इतक्या रकमे इतके तरी रोख पैसे, सोनें किंवा ज्यावर बोजा निर्माण केलेला नाहीं असे रोखे, दररोज धारण केले पाहिजेत.

( १३ ) ज्या ठेवींच्या खात्यांत १० वर्षेपर्यंत कांहीं व्यवहार झालेला नाहीं, अशांची माहिती दरसाल रिझर्व्ह बँकेकडे पाठविणेची आहे. अशा ठेवींतील रकमा सरकारजमा करण्याचा विचार आहे.

( १४ ) ताळेबंदाच्या तारखेनंतर तीन महिन्यांत तो प्रसिद्ध केला पाहिजे.

( १५ ) रिझर्व्ह बँकेमार्फत बँकांच्या तपासणीची व्यवस्था केलेली आहे.

### लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय

लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें या संस्थेस देण्यांत येत असलेली वार्षिक देणगी मुंबई प्रांतिक सरकारनें रु. २,००० नें वाढवून रु. ७,००० केली आहे.

## १९४७-४८ च्या मोसमांतील साखरेचें उत्पादन

१९४६-४७ सालांतील मोसमापेक्षा १९४७-४८ सालांतील साखरेच्या मोसमांत अधिक साखर तयार होईल असा अंदाज करण्यांत आलेला आहे. चालू मोसमांत ९ लाख, २१ हजार टन साखर तयार होईल असें वाटतें. गेल्या सालच्या मोसमांत ९ लाख, १ हजार टन साखर पैदा झाली होती. उत्पादनांतील ही वाढ मुख्यतः मुंबई व बिहार प्रांतांत होईल. चालू सालीं साखरेचे १३१ कारखाने चालू आहेत; गेल्या सालीं १३५ चालू होते.

**प्रांतवार उत्पादन**

| प्रांत | चालू कारखाने | गाळलेला ऊस | साखर | साखरेच्या उताऱ्याची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | ( आकडे हजार टनाचे ) | | |
| सं. प्रांत | ६३ | ५,२२६ | ५१६ | ९.८७ |
| बिहार | २९ | १,२६३ | १२८ | १०.१३ |
| पू. पंजाब | १ | १०३ | १० | १०.०० |
| मद्रास | १० | ६०४ | ५७ | ९.४१ |
| मुंबई | १० | ७७९ | ८३ | १०.६२ |
| प. बंगाल | २ | ६६ | ६ | ९.६२ |
| ओरिसा | १ | १८ | २ | १०.०० |
| हिंदुस्थान | १५ | १,२४६ | ११९ | ९.५६ |
| एकूण | १३१ | ९,३०५ | ९२१ | ९.९० |

हिंदी संघराज्यांतील प्रांत व संस्थानें ह्यांच्यापुरताच वरील तक्ता मर्यादित आहे.

**THE TRAVANCORE OGALE GLASS MFG. CO. LTD., MANJUMMEL ( Alwaye )**

# NOTICE.

The Fifth Annual General Meeting of the Shareholders of the Company will be held on Saturday the 5th June 1948 at 4 p. m. at the Registered Office of the Company at Manjummel (Glass Factory Premises) to transact the following business :

1. To receive and adopt the Directors' Report, audited Balance Sheet and Profit & Loss Account for the period ended 31st December 1947.
2. To elect two Directors in the place of the retiring Directors, who retire by rotation according to Article 112 of the Articles of Association of the Company and are eligible for re-election and offer themselves as such.
3. To appoint auditors for the current year and fix their remuneration.

By Order of the Board,
For Ogale Brothers Limited,

Trivandrum, 6th April, 1948 } SHANKARRAO P. OGALE, Managing Agents.

The Share Transfer Books of the Company will be closed from 24th May 1948 to 5th June 1948, both days inclusive.

## हिंद–पाकिस्तान कापड–कापूस करार

( ले.:— श्री. भा. म. काळे, एम. ए. )

कापडाच्या बहुतेक गिरण्या हिंदमध्यें आहेत, परंतु सिंध व पंजाब ह्या पाकिस्तानी प्रांतांत चांगला कापूस पिकतो. पाकमधून योग्य प्रमाणांत कापसाचा पुरवठा न झाल्यास, हिंदच्या कापड गिरण्या चालूं शकणार नाहींत. तेव्हां कापड व कापूस या बाबतींत दोनहि देशांत देवाण-घेवाण करार होणें आवश्यक होतें व तसा तो झाला असल्याची बातमी आम्हीं मागें प्रसिद्ध केली आहे. हिंदनें पाकिस्तानला १ लक्ष, २० हजार कापडाच्या गाठी द्याव्या व पाकनें हिंदला २ लक्ष गाठी कापूस द्यावा म्हणजे पाकला ६ गाठी कापड देऊन १० कापूस गाठी हिंदनें खरेदी कराव्या अशा स्वरूपाचा हा करार आहे.

ह्या कराराचे बाबतींत जास्त विचार करणें उद्बोधक आहे. ह्या करारामध्यें किंमतींचा निश्चित निर्देश नाहीं; कापड व कापूस ह्यांच्या किंमती बाजारभावावर अवलंबून राहाणार आहेत. सध्यां नियंत्रणामुळें कापडाची किंमत थोडी उतरत चालली असली तरी एकंदरीत किंमती वाढत्या प्रमाणांतच आहेत. जपान, अमेरिका इ. परदेशांतून जर तयार कापड हिंद व पाकमध्यें आयात होऊं लागेल तर हिंदच्या कापड किंमतीवर प्रतिकूल परिणाम होईल. मार्शल योजनेनुसार मिळणाऱ्या मदतीमुळें कदाचित् इंग्लिश कापडहि हिंद पाकमध्यें पुन्हा स्पर्धा करूं लागेल. तशीच स्थिति कच्च्या कपाशीच्या बाजारभावाची आहे. सध्यां कपाशीच्या भावाला तेजी आहे. परंतु पुढें लवकरच जागतिक कपाशीचें उत्पादन वाढल्यास आजचे तेजीचे दर टिकूं शकणार नाहींत. विशेषतः आफ्रिकेच्या उत्तर भागांत कपाशीची लागवड वाढण्याचा बराच संभव आहे.

सध्यां जो करार हिंद-पाक मध्यें ठरलेला आहे तो दीर्घ मुदतीचा किंवा कायम स्वरूपाचा नसावा; तो तात्पुरता एका वर्षापुरता आहे असें दिसतें. असें असल्यामुळें त्या कराराचे चिरकालीन व्यापारी फायदे कोणत्याच देशाला मिळणार नाहींत. कमींत कमी तीन वर्षें किंवा पांच वर्षें मुदतीचा करार झाला असता तर हिंदुस्थानचें भौगोलिक क्षेत्र लक्षांत घेतां तो दोनहि देशांना, हिंदला व पाकलाहि, फायदेशीर ठरला असता. कारण, तेवढ्या तीन किंवा पांच वर्षांच्या मुदतींत तरी वर उल्लेखिलेल्या जागतिक कापड व कापूस पुरवठ्याच्या परिस्थितीपासून दोनहि देश अलिप्त राहूं शकले असते, व त्याचा इष्ट परिणाम हिंदच्या कापड गिरण्यांवर व पाकच्या कापूस-निर्मितीवर झाला असता.

पूर्वींहि अखंड हिंदुस्थाननें ग्रेट ब्रिटन व जपान या देशांशीं देवाण-घेवाण स्वरूपाचे मुदतबंद करार १९३५ ते १९३८ च्या दरम्यान व नंतरहि केले होते. त्या करारांमागील भूमिका आजच्याहून फार भिन्न होती. स्वस्त जपानी कापडापासून जपानकडून कापूस खरेदी करणें मान्य करून किंवा कायम ठेवूनहि, त्यावेळीं अखंड हिंदुस्थानच्या धंद्याचें हित साधावयाचें होतें. ग्रेट ब्रिटनशीं पूर्वी झालेल्या कराराचा हेतूहि उच्च दर्जाच्या ब्रिटिश कापडापासून आपल्या कापड धंद्याचें रक्षण करावयाचें होतें व आपल्या थोड्याशा कापसालाहि ब्रिटनमध्यें कच्चा माल म्हणून स्थान मिळवून द्यावयाचें होतें. सध्यां हिंद–पाक ह्या दोन देशांमधला व्यापारी करार वरील करारांच्या मानानें संकुचित क्षेत्रांतला आहे, परंतु फाळणीमुळें निर्माण झालेल्या औद्योगिक व कृषिविषयक प्रश्नांचा विचार करणारा आहे.

अशा तऱ्हेचा करार करतांना राष्ट्राराष्ट्रांतील निर्गत व आयात जकातींचा प्रश्नहि महत्त्वाचा आहे. सध्यां हा करार परकी देशांमधल्या कराराप्रमाणेंच असल्यामुळें हिंदकडून व पाककडून निर्गत जकात आकारली जाणार. हिंदकडून कापडाच्या किंमतीवर २५ टक्के जकात आकारली जाईल, व पाककडून कापसाच्या एका गाठीवर रु. ६० जकात आकारली जाईल. हिंदमध्यें कच्च्या कपाशीच्या आयातीवर पौंडाला दोन आणे जकात आहेच. कस्टमच्या जकाती सरकारचें उत्पन्नाचें साधन म्हणून योग्य किंवा न्याय्य समजल्या जातात. परंतु हिंद व पाक ह्यांच्या मधील कापड-कापूस करार हा शाश्वत व्यापारी स्वरूपाचा प्रश्न असून असा करार दोनहि देशांना आवश्यक असल्यामुळें, सरकारी कस्टम जकाती शक्य तितक्या कमी प्रमाणांत आकारल्या जाणें गिऱ्हाइकाच्या किंवा कापडाचा उपयोग करणाऱ्या सामान्य नागरिकाच्या दृष्टीनें फायदेशीर ठरेल. तेव्हां, अशा स्वरूपाच्या करारांत जकात कमी ठेवण्याची दृष्टि दोनहि सरकारांनीं ठेवावी.

सदरहू कराराला मुदत, व किंमत म्हणजेच कापूस व कापड ह्यांचे बाजारभाव, ह्या दृष्टीनें जास्त व्यवस्थित स्वरूप येणें जरूर आहे. आज हिंदलाहि कापूस इतर देशांकडून मिळणें कठीण आहे व पाकलाहि इतरांकडून कापडाचा पुरवठा होणें अशक्य आहे. आजच्या परिस्थितींत एक प्रकारच्या परिस्थितिजन्य दडपणामुळें किंवा अपरिहार्यतेमुळें हा करार झाला असला तरी आमचें स्पष्ट मत असें आहे कीं, हिंद–पाकच्या दरम्यान इतरहि वस्तूंच्या किंवा विक्री मालाच्या बाबतींत अशाच स्वरूपाचे परंतु योग्य त्या सुधारणा किंवा फेरबदल करून करार झाल्यास दोनहि देशांच्या अर्थ–व्यवस्थेला, व्यापारी संबंधांना व परस्पर राजकीय संबंधांनाहि पोषक ठरेल. कारण, अशा स्वरूपाच्या विचारपूर्वक केलेल्या देवाण–घेवाण करारांमुळें फाळणीमुळें निर्माण झालेले कांहीं औद्योगिक व आर्थिक प्रश्न सहज रीतीनें सुटतील.

---

### “सिंधमधील सहकारी खातें मोडकळीस आलें.”

सिंधमधील सहकारी खात्यांतील हिंदू नोकरवर्ग सिंध सोडून गेल्या कारणानें, त्या खात्याचें काम मोडकळीस आल्यासारखें आहे. कित्येक बँकांना व सोसायट्यांना आपला रोजचा कारभार चालवणें कठीण जात आहे व कांहीं बँकांना तर व्यवहार बंद ठेवावा लागला आहे. सिंधमध्यें हिंदुस्थानांतून जे निर्वासित गेले, त्यांना सहकारी खात्यांत काम देण्याचे प्रयत्न चालू आहेत. परंतु, सिंधला ते नवखे असून सिंधी भाषेशींहि त्यांचा परिचय नाहीं. सिंध सरकारच्या सहकारी खात्याच्या अहवालांतच वरील बिकट परिस्थिति वर्णन केलेली आहे.

---

### पाकिस्तान आणि परकीय भांडवल

पाकिस्तानचे व्यापार आणि उद्योगमंत्री मि. चुंद्रीगर ह्यांनीं वृत्तपत्र प्रतिनिधींना मुलाखत देऊन पाकिस्तानचें औद्योगिक धोरण कसें राहील ह्याविषयीं माहिती सांगितली. ते म्हणाले, परकीय भांडवल स्वतःसाठीं कांहीं विशेष सवलती मागत नसेल, तर केवळ औद्योगिक दृष्टीनें अशा भांडवलाला पाकिस्तान खुलें राहील. सिमेंट, कोळसा, कापडाच्या व सुताच्या गिरण्या, कागदाचे कारखाने, इत्यादींतून निदान ५१ टक्के भांडवल पाकिस्तानच्या नागरिकांनीं घेण्यास परवानगी असावी; इतर उद्योगधंद्यांतून निदान ३० टक्के भांडवल पाकिस्तानी नागरिकांचें रहावें. शस्त्रास्त्रांचे कारखाने, पाण्याच्या प्रवाहापासून निर्माण होणारी वीज, रेल्वेचे डबे, टेलिफोन, टेलिग्राफचें सामान, इत्यादींचे कारखाने सरकारच्या मालकीचे रहातील.

### मुंबई सरकार सुट्ट्या कमी करणार

मुंबई प्रांतांत सध्या दरसाल २१ सार्वजनिक सुट्टींचे दिवस आहेत, ते १५ वरती आणण्यांत येणार आहेत. ३० जानेवारीस महात्मा गांधी दिनाची सुट्टी मिळेल आणि १५ ऑगस्टला स्वातंत्र्य दिनाची सुट्टी आहे. बाकीच्या १२ सुट्ट्या खालीलप्रमाणें राहतील.

**५ हिंदू सण:** रामनवमी, कृष्णाष्टमी, गणेशचतुर्थी, दसरा, दिवाळी.

**२ मुसलमानी सण:** रमजान, बकरईद

**२ पारशी सण:** झारथोस्टनो दिसो, खुर्दादसाल

**२ ख्रिस्ती सण:** गुड फ्रायडे, ख्रिसमस डे

**१ जैन सण:** महावीर जयंती (चैत्र शु. १३

सध्याच्या बाकीच्या सार्वजनिक सुट्ट्या सार्वत्रिक न मिळतां, त्या त्या धर्माच्या लोकांपुरत्या मर्यादित रहातील.

राजाच्या वाढदिवसाची सुट्टी ह्यापुढें मिळणार नाहीं. त्याचप्रमाणें महाशिवरात्र व होळी ह्या सुट्ट्या रद्द झाल्या असून दिवाळीची एकच दिवस सुट्टी मिळेल. रामनवमीची सुट्टी चालू होईल. ख्रिस्ती वर्षारंभ व बॉक्सिंग डे (२६ डिसेंबर) ह्याहि सुट्ट्या गेल्या. सुट्ट्यांची मोठी संख्या हें देशाच्या मागसलेपणाचें लक्षण आहे. तें दूर करून आर्थिक व्यवहार जास्त दिवस चालू ठेवण्याचें सरकारचें धोरण प्रगतिपर असेंच आहे.

### शहाबाद दगडाच्या वहातुकीस प्राधान्य हवें

वाडी व शहाबाद या स्टेशनांतून सिमेंट व शहाबाद दगड हिंदुस्थानांतील निरनिराळ्या ठिकाणी रवाना होतो. परंतु २९ मार्चला जी. आय्. पी. रेल्वे मार्फत प्रसिद्ध होणाऱ्या प्रायॉरिटीच्या पत्रकांत सिमेंटचा अंतर्भाव करण्यांत आला असून शहाबाद दगडाचा मात्र त्यांत उल्लेख नाहीं. गेले तीनें महिने शहाबाद दगडास वहातूक न मिळाल्यामुळें निरनिराळ्या ठिकाणच्या व्यापाऱ्यांची मागणी दगडाचा भरपूर स्टॉक असूनही व्यापाऱ्यांना पुरविणें शक्य झालें नाहीं. शहाबाद दगड सिमेंट प्रमाणेंच घराच्या बांधकामास लागणाऱ्या आवश्यक गोष्टींपैकी असल्यामुळें शहाबाद दगडास सिमेंटप्रमाणें बुकिंगमध्यें प्रायॉरिटी देण्यांत यावी असें मुंबईच्या महाराष्ट्र चेंबरच्या कार्यकारी मंडळानें आपलें मत जी. आय. पी. रेल्वेच्या चीफ मॅनेजरला कळविलें आहे.

### सहकारी बँकेची पानसुपारी

पूना मर्चंट्स को. बँक लि. पुणें, ह्या संस्थेनें प्रतिवर्षाप्रमाणें १० एप्रिल रोजीं गुढीपाडव्यानिमित्त श्री सरस्वती व श्री लक्ष्मी पूजन करून पानसुपारी समारंभ घडवून आणला.

### "व्यापारी महाराष्ट्र" च्या संपादकाचा मृत्यु


"व्यापारी महाराष्ट्र" ह्या पाक्षिकाचे संपादक, 'व्यापार विशारद' श्री. हरी श्रीपाद घारे हे वयाच्या ४६ व्या वर्षी ता. १४ रोजीं मृत्यु पावले, हें नमूद करण्यास दुःख होतें. श्री. ग. कृ. भोपटकर ह्यांनीं स्थगित केलेलें "व्यापारी महाराष्ट्र" श्री. घारे ह्यांनीं १९३८ सालीं पुनः सुरू करून यशस्वी रीतीनें चालविलें. व्यापार क्षेत्रांत मागसलेल्या महाराष्ट्रास व्यापारी वळण लावण्याचा त्यांनीं अखंड प्रयत्न केला आपलीं मतें निर्भीडपणें मांडणें व विचारपूर्वक टाकलेलें पाऊल मागें न घेणें, हा त्यांचा बाणा होता. मराठी भाषेंतूनच व्यापारी व कारखानदार ह्यांनीं व्यवहार चालवावेत, असा त्यांनीं प्रयत्न केला. श्री. घारे ह्यांची कित्येक वर्षे प्रकृति बरी नव्हती; तथापि त्यांचा मृत्यु इतक्या नजीक असेल अशी कोणाचीच कल्पना नव्हती. त्यांच्या मृत्यूनंतरहि "व्यापारी महाराष्ट्र" पूर्ववत चालू राहण्याची व्यवस्था झालेली आहे, ही समाधानाची गोष्ट आहे.





'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



अधिक धान्य पिकविण्याची योजना
—यशस्वी होण्यास—
किर्लोस्कर पंपिंग सेट्स
हें अमोघ साधन आहे.
त्याचें सहाय घ्या !
किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

## मुंबई प्रांतिक सहकारी परिषद्.

( प्रतिनिधीच्या दृष्टिकोनांतून )

मुंबई प्रांतिक सहकारी परिषदेचें १९ वें अधिवेशन मुंबई येथें दि. ११,१२,१३ दिवशीं झालें. अधिवेशन तीन वर्षांनंतर व तेंहि युद्धकाळानंतर होत असल्यानें महत्त्वाचें होईल अशी बरीच अपेक्षा प्रतिनिधींची होती. परंतु प्रतिनिधी अधिवेशनाहून परत जातांना निराश झाल्याचें दिसून येत होतें. परिषदेस उद्घाटक, अध्यक्ष व स्वागताध्यक्ष नामवंत असे मिळाले व त्यांनीं सहकारी चळवळीचा योग्य असा आढावा घेतला. अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत शेती उत्पादनाचे बाबत बऱ्याच महत्वाचे प्रश्नांचा विचार केला व रशियन पद्धती हिंदुस्थानमध्यें उपयोगी पडणार नाहीं असें त्यांनीं सांगितलें. शेती उत्पादन वाढविण्याकडे जास्त लक्ष दिलें पाहिजे असेंही त्यांनीं सांगितलें.

परिषदेच्या चालू अधिवेशनाचें एक वैशिष्ट्य म्हणजे परिषदेचा एक भाग स्त्रियांसाठी राखून ठेवला होता. स्त्री-परिषद् विभागाचें उद्घाटन राजकुमारी अमृत कौर यांनीं केलें. ह्या विभागास दिलेला वेळ व केलेली चर्चा यास दिलेलें महत्त्व जास्त होतें असें वाटतें. ठराव करण्यापूर्वी केलेलीं भाषणें प्रतिनिधी-प्रेक्षकांना शाळेंतील धड्याप्रमाणें मुकाट्यानें ऐकावीं लागलीं. परिषदेपुढें विचारासाठी ठरावांचे मसुदे असे फार थोडे होते. एकूण पांच विषयनियामक समितींमधून विषयांचे मसुदे तयार करण्यांत आले. विषयानियामक समितीमध्येंही चर्चेस वाव मिळाला नसल्याची तक्रार आहे. परिषदेचें काम शक्य तितक्या लवकर व ठराविक वेळींच उरकावयाचें असल्यानें शेवटचे दिवशीं तर खुल्या अधिवेशनांत ठरावांवरील चर्चा आटोपती घेण्याबद्दल ताकीद दिली.

परिषदेपुढें आलेले ठराव एकूण ( स्त्री विभाग सोडून ) सुमारें २० होते. त्यामध्यें महत्त्वाचे म्हणजे सहकारी शेती, देखरेख, औद्योगिक सहकारी बँक व विधि मंडळांत सहकारी पक्ष स्थापणें हे होत. परिषदेच्या कार्याच्या दृष्टीनें चालकांनीं असें ठरविलें कीं विषयनियामक समितीच्या अध्यक्षांनीं ठराव सुचवावे व त्यास दुसऱ्या कोणी अनुमोदन द्यावें व नंतर ठराव चर्चेस यावेत. यामुळें ठरावांवरील चर्चेस मोकळेपणाचें स्वरूप आलें नाहीं; केवळ औपचारिक स्वरूप आलें व त्यांतच भाषेच्या अडचणीमुळें प्रत्येकाच्या मातृभाषेंत कांहीं ठरावावर चर्चा झाल्यानें थोडी मनोरंजकता उत्पन्न झाली.

सहकारी चळवळीच्या दृष्टीनें ठरावांचें महत्त्व व गांभीर्य फारसें राहात नाहीं असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. शिवाय आजवर प्रत्येक विषयावर अभ्यासू प्रतिनिधी अधिकारवाणीनें बोलत असत. परंतु या अधिवेशनांत त्यांचा अभाव चांगलाच भासला.

परिषद् चालकांनीं व्यवस्थेंत बरेंच शैथिल्य दाखविलें असें प्रतिनिधींच्या बोलण्यावरून दिसून येतें. स्वागत, बसण्याची व्यवस्था व स्वागताध्यक्ष, उद्घाटक, अध्यक्ष यांचीं भाषणें देण्याचे बाबत फारच अनास्था दिसून आल्याचें दिसून आलें. कदाचित् इन्स्टिट्यूटचे कचेरीमध्यें कार्यकर्त्यांचा अभाव असल्यामुळें असें होणें शक्य आहे. परंतु मुंबईसारख्या शहरीं व जेथें प्रांतिक सहकारी संस्थांच्या कचेऱ्या आहेत तेथें संपूर्ण सहकार्यानें परिषद् कार्य व्हावयास पाहिजे अशी अपेक्षा असणें योग्यच आहे.

या पुढील सहकारी परिषदेच्या चालकांस अशी विनंति कीं त्यांनीं अशी परिषद् केवळ मुंबईस न भरवतां प्रांतांत जिल्ह्याचे ठिकाणीं बोलवावी म्हणजे स्थानिक चालकांस अनुभव येऊन त्यांमध्य उत्साह येईल. त्याचप्रमाणें परिषदेमध्यें प्रचलित अशा दोन विषयासंबंधी माहितीपूर्ण अशी चर्चा करून त्यासंबंधी ठराव करून त्यांची अमलबजावणी करण्याचें काम करावें.

## नोटीस.

### दी बँक ऑफ औंध, लिमिटेड.

नोटीस देणेत येते कीं,

बँकेच्या भागीदारांची वृहावी सर्वसाधारण सभा रविवार ता.१६ मे १९४८ रोजीं सकाळीं ९ वाजतां ( स्टँ. टा. ) बँकेचे रजिस्टर्ड ऑफिस औंध येथें त्र्यंबक कलाभवनांत खालील कामाकरतां भरणार आहे.

१. ३१ डिसेंबर १९४७ अखेर संपलेल्या सालाबद्दलचा डायरेक्टरांचा अहवाल, ताळेबंद, नफातोटापत्रक व ऑडिटर यांचा रिपोर्ट स्वीकारून मंजूर करणें.

२. डिव्हिडंड जाहीर करणें.

३. पाळीप्रमाणें निवृत्त होणारे डायरेक्टरांचे जागीं ( ते फेर निवडणुकीस पात्र असलेनें ) नवीन डायरेक्टरांची निवडणूक करणें.

४. नवीन सालाकरतां ऑडिटर यांची नेमणूक करणें व त्यांचें वेतन ठरविणें.

सातारा
ता. २८ मार्च १९४८

बोर्डाचे हुकुमावरून,
बा. रा. वर्तक
मॅनेजिंग डायरेक्टर.

वि. सू.:—बँकेचीं ट्रॅन्स्फर बुकें ता. १६-५-४८ ते ३०-५-४८ अखेर दोन्ही दिवस धरून बंद राहतील.

डिव्हिडंड मंजूर झाल्यावर तें सोमवार ता. ३१ मे १९४८ पासून दिलें जाईल. डिव्हिडंड वॉरंट्स भागीदारांच्या नोंदलेल्या पत्त्यावर पोष्टानें पाठविलीं जातील. पत्ता बदलला असल्यास बँकेकडे सत्वर कळवावें.

## नोटीस.

### दी बँक ऑफ औन्ध, लिमिटेड.

नोटीस देणेत येते कीं,

दी बँक ऑफ औन्ध लि. च्या भागीदारांची विशेष साधारण सभा रविवार ता. १६ मे १९४८ इ. रोजीं सकाळीं ९—३० वाजतां ( स्टँ. टा. ) अगर त्या दिवशीं सकाळीं ९ वाजतां बोलाविलेल्या साधारण सभेचें काम संपलेबरोबर लगेच बँकेचें रजिस्टर्ड ऑफिस औन्ध येथें त्र्यंबक कलाभवनांत खालीं नमूद केलेल्या स्पेशल ठरावाचा विचार करणेंस व योग्य वाटलेस तो मंजूर करणेसाठी भरणार आहे.

ठरावः—खालीं नमूद केलेली बँकेच्या आर्टिकल्स ऑफ असोसिएशनमधील दुरुस्ती पसंत असून ती मंजूर करणेत येत आहे.

आर्टिकल नं. ३५:—"दि रजिस्टर्ड ऑफिस ऑफ दि कंपनी" हे शब्द गाळून त्याऐवजीं "सच टाईम अँड प्लेस अॅज मे बी. डिटरमिंड बाय दी डायरेक्टर्स" असे शब्द घालणें.

सातारा
२८ मार्च, १९४८.

बोर्डाचे हुकुमावरून,
बा. रा. वर्तक
मॅनेजिंग डायरेक्टर.

## NOTICE

It is hereby notified that the Share Registers of the Bank will be closed and the registration of transfers suspended from the 4th June 1948 to the 30th June 1948 ( both days inclusive ).

Reserve Bank of India,
Central Office, Bombay,
Dated the 9th April, 1948.

C. D. DESHMUKH,
Governor.

### आगामी वारसा कायद्याचें स्वरूप

(१) कायदा अंमलांत आल्यानंतर होणाऱ्या प्रत्येक मृत्यूचे वेळीं वारसाहक्कानें जाणाऱ्या मालमत्तेवर हा कर बसविला जाईल. शेतीची जमीन ह्या मालमत्तेंत समाविष्ट होणार नाहीं.

(२) वारसा कराची आकारणी झालेली मालमत्ता पुनः पांच वर्षांत ह्या करास पात्र झाली, म्हणजे लवकर मृत्यु येऊन पुनः वारसा हक्कानें मालमत्ता गेली तर नव्या कराचा आकार कमी होईल. दुसरा मृत्यु जितक्या लवकर येईल त्या मानानें वारसा कर कमी.

(३) वारसा कराचा दर मध्यवर्ती सरकार ठरवील. १ लक्ष रुपयांखालील मालमत्तेस कर द्यावा लागणार नाहीं. मृत्यूच्या तारखेस बाजारभावानें होणारी तिची किंमत कर आकारणीसाठी गृहीत धरली जाईल. दहनविधीस लागणारा वाजवी खर्च आणि कांहीं अपवाद सोडून कर्जें, हीं मालमत्तेच्या किंमतींतून वजा घालून कर आकारण्यांत येईल.

(४) ज्याला वारसाहक्कानें मालमत्ता मिळेल तो वारसदार सर्व करास आणि ट्रस्टी, गार्डिअन, कमिटी, हे प्रत्येकजण त्यांचेकडे आलेल्या मालमत्तेपर्यंतच्या रकमेच्या करास जबाबदार धरले जातील.

(५) वारसा कर मृत्यूच्या दिवशीं देणें लागू होईल आणि तेव्हांपासून हिशेबाच्या तारखेपर्यंत किंवा ६ महिनेपर्यंत (जी मुदत कमी भरेल ती) ३% व्याज ह्या कराच्या रकमेवर वारसदारास भरावें लागेल. जमीन महसुलाच्या बाकीप्रमाणेंच वारसा कर कलेक्टरामार्फत वसुल केला जाईल.

---

### दि कमर्शिअल बँक लि., कोल्हापूर

वरील बँकेनें १९४७ सालीं ठेवींवर १,९५,९८० रु. व्याज दिलें व व्याज, डिस्कौंट, कमिशन, इत्यादींचे रूपानें ३,१८,१९३ रु. मिळविले. व्यवस्था खर्च वजा जातां ४१ लक्ष रुपयांच्या खेळत्या भांडवलावर ४८,८९८ रु. निव्वळ नफा उरला; ह्यावरून बँकेच्या किफायतशीरपणाची कल्पना येईल. बँकेचें वसूल भांडवल १,५०,०१० रु. असुन रिझर्व्ह व इतर फंड १,०१,७५० रुपयांचे आहेत. ठेवी ३७ लक्ष रुपयांवर आहेत. जिंदगीचे बाजूस १२¾ लक्ष रु. रोख व बँकांत, ४¾ लक्ष रु. बिल्स डिस्कौंटेड, इनव्हेस्टमेंटस २ लक्ष रु., कर्जें इ. २०¾ लक्ष रु., असे आकडे आहेत. बँकेच्या स्वतःच्या इमारतखातीं १,०६,००० रु. आहेत. १९४७ सालाच्या नफ्यांतून २२ हजारांची कराची तरतूद केली, रिझर्व्ह फंडांत १० हजार रु. टाकले, डि ई. फंडाकडे १½ हजार रु. वर्ग केले व भागीदारांना एकूण १०% डिव्हिडंड देण्यासाठीं १५ हजार रुपयांचा विनियोग केला. प्रिन्सिपॉल एस. जी. दाभोळकर हे बँकेच्या बोर्डाचे चेअरमन असून श्री. गणपतराव लक्ष्मणराव साळोखे हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. बँकेची वार्षिक सभा ता. ११ एप्रिल रोजीं झाली.

---

### ज्वाला बँकेस ठेवी घेण्यास बंदी

दि ज्वाला बँक लि., आग्रा,ला १२ एप्रिल, १९४८ पासून नव्या ठेवी स्वीकारण्याची मनाई करण्यांत आली आहे. कांहीं महिन्यांपूर्वी हिंदुस्थान सरकारनें ह्या बँकेची रिझर्व्ह बँकेकरवीं तपासणी करवली. ह्या तपासणीच्या अहवालावरील बँकेचें म्हणणें ऐकून घेऊनच, ठेवीदारांच्या हिताचे दृष्टीनें वरील मनाई हुकूम काढण्यांत आला आहे. ज्वाला बँक १९३८ सालीं स्थापन झालेली आहे व ती शेड्यूल्ड बँकांच्या यादींत आहे.


उन्हाळ्याच्या उष्णतेवर

गु ल कं द

स्वादीसा खरेचा,
प्रवाळयुक्त,
व
साधा

श्री धूतपापेश्वर पनवेल लि०
पुणें डेपो— सिटी पोस्टासमोर



कृष्णा शुगर मिल्स लि.

कृष्णा–कित्तूर

कन्फेक्शनरी सुरू झाली.

धंद्याच्या वाढीसाठी ठेवी स्वीकारल्या जातात.

६% क्यु. प्रेफरन्स शेअर्स विक्रीस आहेत.

विशेष माहितीसाठी लिहा.

पोस्टः–कृष्णा–कित्तूर
जिल्हाः–बेळगांव.

विंचूरकर अँण्ड को.
मॅनेजिंग एजण्टस्.



नवीन पुष्कळ निघाले, तरी

तुळजाराम मोदी,

सातारा

ह्यांचें पुढारीपण कायम आहे.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि घर्वे यांनीं छापिलें व
ए. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८१३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.